पआका/का.१३/प्रशिक्षण-०९/वि.प.२०१७/जा.क्र. 2446

**परिवहन आयुक्त कार्यालय**

प्रशासकीय इमारत, ३रा व ४था मजला,
डॉ. आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

दिनांक :- 10 FEB 2017

प्रति,
**सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी**
**सर्व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी**

**विषय:-** विभागातील लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांची सेवा प्रवेशोत्तर विभागीय परीक्षा-२०१६ चा निकाल घोषित करणेबाबत.

मोटार वाहन विभागातील लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांची सेवा प्रवेशोत्तर विभागीय परीक्षा दि. ११ व १२ जून २०१६ मध्ये घेण्यात आली होती. सदर परीक्षेचा निकाल घोषित करण्यात येत असून परीक्षा केंद्रनिहाय ठाणे, पुणे, औरंगाबाद आणि नागपूर अशा चार भागामध्ये प्रकाशित करण्यात येत आहे. **त्यापैकी औरंगाबाद परीक्षा केंद्र निकालाची प्रत सोबत जोडली आहे.** सदर निकाल मोटार वाहन विभागाच्या www.transport.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर देखील प्रदर्शित करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

आपणास सूचित करण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालील सर्व संबंधित लिपिकांना याबाबत तातडीने अवगत करावे. तसेच विभागीय परीक्षेतील प्राप्त गुणांबाबत उत्तरपत्रिकांच्या फेरतपासणीची तरतूद लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांची विभागीय परीक्षा नियम, १९८४ मध्ये नसल्याने, परीक्षार्थींनी फेरतपासणीसाठी अर्ज करु नये, याबाबत परीक्षार्थींना सूचित करावे.

**(अ.ना.भालचंद्र)**
**परिवहन उप आयुक्त (प्रशासन),**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**(परिवहन आयुक्त यांच्या मान्यतेने)**

**संलग्न :-** औरंगाबाद परीक्षा केंद्र निकालाची प्रत (पृष्ठे १ ते ४)